## जे.एस.एम.कॉलेज, अलिबाग-रायगड
## ऑनलाईन परीक्षेसंबंधी विद्यार्थ्यांना सूचना

➢ **विद्यार्थ्यांनो कृपया लक्षात घ्याः**

१. परीक्षा ऑनलाइन पद्धतीने बहुपर्यायी प्रश्नांसह (MCQ) घेतली जाईल.

२. एकूण ५० गुणांसाठी २५ प्रश्न असतील जे सोडविण्यासाठी एक तासाचा कालावधी उपलब्ध असेल.

३. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी चार पर्याय असतील. त्यापैकी एक अचूक उत्तर विद्यार्थ्यांनी निवडावे.

४. परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याने परीक्षेला सुरुवात होण्यापूर्वी योग्य इंटरनेट / वायफाय सुविधा आणि अँड्रॉइड मोबाइल फोन / लॅपटॉप / डेस्कटॉप या गोष्टी तुमच्याकडे उपलब्ध असल्याची तसेच मोबाईल फोन १००% चार्ज असल्याची खात्री करा. आवश्यकता असल्यास Power Bank सोबत ठेवा.

५. परीक्षा देण्यासाठीची लिंक, युझर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या मोबाईल नंबरवर किंवा महाविद्यालयात नोंदणीकृत ई-मेलवर* पाठविण्यात येईल.

(* आपला मोबाइल नंबर / ई-मेल आयडी यामध्ये काही बदल असल्यास विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधून ते अद्ययावत (Update) करावे.)

६. प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी तयार राहावे.

७. ही ऑनलाईन पद्धतीची परीक्षा असल्याने निकालानंतर कोणत्याही प्रकारचे पुनर्मूल्यांकन (Revaluation) केले जाणार नाही तसेच विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची छायाप्रत (Photo copy) उपलब्ध होणार नाही.

८. परीक्षेसंबंधीच्या कोणत्याही सूचनांसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या वेबसाइटवर अवलंबून रहावे आणि शिक्षकांच्या संपर्कात राहावे. कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आलेले अनधिकृत संदेश, सूचना यावर विश्वास ठेवू नका.

९.मुख्य परीक्षेच्या आधी सत्र पाचसाठी (ATKT) दिनांक २३/०९/२०२० रोजी व सत्र सहासाठी (Regular) दिनांक २८/०९/२०२० रोजी सराव परीक्षा (MOC TEST) घेण्यात येईल. त्यासंबंधीची सूचना विद्यार्थ्यांना सराव परीक्षेपूर्वी देण्यात येईल.

१०. परीक्षा देण्यासंबंधी काही अडचण असल्यास विद्यार्थ्याने आपल्या विषयाच्या विभागप्रमुखांशी किंवा खालील हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.

1.9404219494 2.9881813301 3.9822986414

**(हे मोबाईल नंबर केवळ परीक्षेच्या कालावधीत सक्रिय (Active) असतील.**

➢ **विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यायच्या तांत्रिक बाबी (Technical feature):**

- विद्यार्थ्याने परीक्षेसाठी Log in केल्यानंतर त्याला सर्व प्रश्न निर्धारित वेळेत (एक तास) पूर्ण करावे लागतील आणि उत्तरपत्रिका Submit करावी लागेल.
- विद्यार्थ्याने प्रश्न सोडविण्यास सतत Active असले पाहिजे, विद्यार्थ्याने जर दोन मिनिटांपेक्षा अधिक वेळ कोणतीही कृती केली नाही तर उत्तरपत्रिका आपोआप बंद होईल .(किमान स्क्रोलिंग करणे अपेक्षित आहे.)
- नेटवर्क जाणे / वीज जाणे अशा गोष्टींमुळे जर उत्तरपत्रिका सोडविण्यात काही व्यत्यय आला तर विद्यार्थी उर्वरित वेळेसह तीच प्रश्नपत्रिका पुन्हा सोडवायला सुरुवात करू शकतो.
- परीक्षा देताना विद्यार्थ्यांनी कोणताही अनुचित प्रकार करू नये. तसे आढळून आल्यास विद्यापीठाच्या नियम व कायद्यांनुसार अनुचित प्रकारासाठी विद्यार्थ्यावर महाविद्यालयामार्फत कारवाई केली जाईल.

PRINCIPAL,
Smt. Indirabai G. Kulkarni Arts,
J. B. Sawant Science and
...

Scanned by CamScanner